॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲
संगीत म्हणजे परमेश्वराने दिलेली वैभवशाली व सुंदर देणगी आहे.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३२० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

# सावकारी छळाला कंटाळून पुजाऱ्याची आत्महत्या

## चिठ्ठीत नाव असलेल्या तिघांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी –** तालुक्यातील धामणगाव देवी येथील जगदंबा देवी मंदिराचे पुजारी रामदास बापुराव शिंदे (वय ५५) यांनी सावकारी जाच आणि आरोपींकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून विष पिऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी मयताच्या खिशात सापडलेल्या मृत्यूपूर्व चिठ्ठीतील (सुसाईड नोट) गंभीर आरोपांवरून पाथर्डी पोलिसांनी साकेगाव येथील दोन आणि पाथर्डी येथील एक अशा तीन जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मयत रामदास शिंदे हे गेल्या २० वर्षांपासून धामणगाव येथे पुजारी म्हणून कार्यरत होते. दि. २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास ते घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेले होते.

रात्रभर घरी न परतल्याने कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला असता, ३ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास ते स्वतः च्या शेतातील विहिरीच्या कडेला बेशुद्धावस्थेत मिळून आले. त्यांच्या तोंडाला फेस आला असल्याने त्यांनी विषारी औषध प्राशन केल्याचे लक्षात आले. त्यांना तातडीने पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.



पोलिस पंचनाम्यादरम्यान मयत रामदास शिंदे यांच्या पॅन्टच्या खिशात एक चिठ्ठी आढळून आली, ज्यामध्ये त्यांच्या मृत्यूचे धक्कादायक कारण समोर आले आहे. चिठ्ठीत नमूद केल्यानुसार, आरोपी अनिल बाबूराव पवार याच्याकडून घेतलेल्या ३० हजार रुपयांच्या बदल्यात शिंदे यांनी आतापर्यंत ७ लाख रुपये परत केले होते. तरीही आरोपींची पैशांची हाव मिटली नव्हती. आरोपींनी सात लाख रुपये घेऊनही शिंदे यांच्या घरातील महिलांविषयी आणि मुलींविषयी अत्यंत अश्लील व खालच्या पातळीवर जाऊन भाष्य केले. तुझ्या बायको-मुलीवर इतके वाईट बोलतात, त्यामुळे मी आज माझे जीवन संपवत आहे, असे हृदयद्रावक वास्तव शिंदे यांनी चिठ्ठीत लिहून ठेवले आहे. माझ्यासारखा गरीब माणूस यांच्या जाळ्यात अडकू नये, असेही त्यांनी नमूद केले आहे.

याप्रकरणी मयताची मुलगी भारती वैभव थोरात (वय २६, रा. बाराबाभळी) हिने पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अनिल बाबूराव पवार (रा. साकेगाव), महेश अनिल पवार (रा. साकेगाव) आणि अर्जुन माने (रा. पाथर्डी) या तिघांविरुद्ध वारंवार त्रास देऊन आत्महत्येस भाग पाडल्याप्रकरणी कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे. ग्रामीण भागात पसरलेल्या खासगी सावकारीच्या विळख्याने एका पुजाऱ्याचा बळी घेतल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पाथर्डी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## SPOT NEWS

### सुनेत्रा पवारच राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय पक्षाध्यक्ष

**● मुंबई –** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत रचनेत गेल्या २ महिन्यांत मोठे फेरबदल झाले असून, आता पक्षाची धुरा अधिकृतपणे सुनेत्रा पवार यांच्या हाती आली आहे. १६ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ दरम्यान घडलेल्या वेगवान घडामोडींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्षाच्या नव्या ठरावांना आणि कार्यकारिणीला मान्यता दिली. यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून आणि पार्थ पवार यांची खासदारकी कायदेशीररित्या भक्कम झाली आहे. कार्याध्यक्ष (प्रफुल्ल पटेल) यांना राष्ट्रीय अध्यक्षांच्या समकक्ष अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, निवडणूक आयोगाने ही नवी घटना स्वीकारली नाही किंवा तिला मान्यताही दिली नाही. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात अत्यंत महत्वाचे २ निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच पक्षाच्या मूळ घटनेत बदल करून कार्यकारिणीची मुदत ३ वर्षांवरून ५ वर्षांपर्यंत वाढवण्यात आली.

### मराठी न बोलता येणाऱ्या रिक्षाचालकांचा परवाना रद्द?

**● मुंबई –** रिक्षा परवाना घेतल्यानंतरही मराठी बोलता येत नसलेल्या चालकांची पुन्हा खातरजमा करण्याचे आदेश राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयांना दिले आहेत. त्यामुळे मराठी येत नसलेल्या रिक्षाचालकांच्या परवान्यांवर गंडांतर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राज्यात विविध शहरांमध्ये शासनाकडून रिक्षाचालकांना परवाने (परमीट) देण्यात आले असून, त्याच आधारे वाहतूक पोलिसांकडून रिक्षा चालवण्यास परवानगी दिली जाते. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणा-या नागरिकांनाच हे परवाने दिले जातात. मात्र, काही दिवसांपूर्वी बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने मिळवल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

# नाशिकमध्ये महिलांच्या शोषणासंबंधी आणखी एक धक्कादायक घटना उघडकीस

**● नाशिक । वीरभूमी –** नाशिकमधील भोंदू अशोक खरातचे प्रकरण संपूर्ण देशभर चर्चेत आहे. एसआयटीकडून या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच नाशिकमध्ये अशाच प्रकारे महिलांच्या लैंगिक शोषणासंबंधी आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. 'खरात पार्ट २' अशी चर्चा नाशिकमध्ये या आता सुरू आहे.

शहराच्या सातपूर परिसरात घडलेल्या या प्रकरणाने नाशिक शहर पुन्हा एकदा हादरले आहे. स्वतःला पत्रकार व लघुउद्योजक कन्सल्टंट म्हणवणा-या ६३ वर्षीय व्यक्तीने आपल्याकडे १२ लाखांची खंडणी मागितली जात असल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. त्यानुसार त्याला ब्लॅकमेल करणाऱ्या चौघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. पण, त्यातून तक्रारदाराचेच महिलांच्या अत्याचाराचे शेकडो व्हीडीओ पोलिसांच्या हाती लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणात तक्रारदाराच्या कार्यालयातून चोरून नेलेल्या टॅबमधील अश्लील व्हीडीओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल १२ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी चौघांनी केली होती. अटक केलेल्या चौघांच्या टोळीमधील एक संशयित हा तक्रारदाराकडे 'ऑफिसबॉय' होता. त्याच्या चौकशीतून धक्कादायक खुलासा झाला आहे.

स्वयंघोषित पत्रकार असलेला तक्रारदार रवींद्र गणपत एंडे हा २००३ पासून अनेक महिलांना उद्योग उभारणीचे आमिष दाखवून त्याने आपल्या केबिनमध्ये बोलावले. त्यांच्या अडचणींचा फायदा घेत अत्याचार केले. या अत्याचाराचे त्याने छुप्या रीतीने रेकॉर्डिंग केले. हे सर्व व्हीडीओ त्याने टॅब आणि हार्डडिस्कमध्ये साठवून ठेवले होते.

दरम्यान त्याच्याकडे ऑफिसबॉय म्हणून काय करणाऱ्या आकाश बकरे याने टॅब व हार्डडिस्क चोरली. त्यात १०० हून अधिक अश्लील व्हीडीओ पाहून त्याने आपल्या तीन मित्रांच्या मदतीने तक्रारदार रवींद्र गणपत एंडे याला ब्लॅकमेल करण्यास सुरवात केली. व्हिडिओ व्हायरल न करण्यासाठी १२ लाख रुपयांची मागणी केली. सुरुवातीला एंडे यांनी त्यांना १० हजार रुपये दिले. परंतु ब्लॅकमेल करणाऱ्या चौघांची मागणी वाढत गेल्याने त्याने सातपूर पोलिस ठाण्यात धाव घेत चोरी व खंडणीची तक्रार दाखल केली.

# नवरी लग्नाच्या काही तासांतच फरार

## दागिने व मोबाईलसह पलायन । पाथर्डी तालुक्यातील सुसरे येथील घटना

**● पाथर्डी । वीरभूमी –** पाथर्डी तालुक्यातील सुसरे येथे एक धक्कादायक आणि संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एजंटमार्फत पैसे देऊन आणलेल्या नवरीने लग्नानंतर अवघ्या काही तासांतच घरातील मौल्यवान वस्तू घेऊन पलायन केल्याने कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुसरे येथील २४ वर्षीय तरुणाचे जालना जिल्ह्यातील एका मुलीशी एजंटच्या मध्यस्थीने लग्न ठरविण्यात आले होते. यासाठी मुलीच्या नातेवाईकांना मोठी रक्कम देण्यात आली होती.

३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी विधिवत विवाह सोहळा पार पडला. त्यानंतर रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास नववधू सुसरे येथील नवरदेवाच्या घरी दाखल झाली. घरात पारंपरिक शुभविधी पार पडले आणि नव्या संसाराच्या सुरुवातीमुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण होते.

मात्र हा आनंद फार काळ टिकला नाही. पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास नववधूने घरातील मोबाईल, एक तोळ्याची पोत तसेच नवरदेवाचे एक तोळ्याचे मंगळसूत्र घेऊन घराच्या संरक्षण भिंतीवरून उडी मारून पलायन केले.

सकाळी हा प्रकार उघडकीस येताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नवरदेव व नातेवाईकांनी तातडीने पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील विवाह व्यवस्थेतील अडचणी आणि एजंटमार्फत होणाऱ्या विवाहातील धोके पुन्हा समोर आले आहेत. सामाजिक अडचणींचा गैरफायदा घेत अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना वाढत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, पोलिसांकडून संबंधित नववधू व एजंटचा शोध सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# राहुरी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत महाविकास आघाडी उमेदवार देणार

## अंकुश काकडे । राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची बैठक संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पक्ष कार्यालयात प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.

यावेळी खासदार निलेश लंके, दक्षिण जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, रावसाहेब मस्के, अरुण पाटील कडू, बाबासाहेब भोस, राजेंद्र कोठारी, अशोक बाबर, योगिता राजळे, नामदेव राऊत, सिताराम काकडे, किसनराव लोटके, अथर खान, निलेश मालपाणी, बापूसाहेब रांधवणे, सुरेश गडाख, विजयसिंह गोलेकर, रघुआबा काळदाते, शौकत तांबोळी, विनोद साळवे, हरिदास शिर्के, बाळासाहेब हराळ, शरद पवार, हरीश भारदे, शिवशंकर राजळे,फारुक रंगरेज, बाळासाहेब भांगरे, सुरेश खांडगे, रमेश गव्हाणे, अशोक बागुल, लकी सेठी, चंद्रकांत घुले, शशिकांत लोळगे यांचेसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत सर्व तालुका अध्यक्ष, नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्त्यांनी आपापले मनोगत व्यक्त करत पक्षाच्या पुढील वाटचालीसाठी विविध उपाययोजना व आंदोलनाची रणनीती मांडली. पक्ष बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांना सक्षम पाठबळ देणे गरजेचे असून, आलेली मरगळ एकजुटीने दूर करून नव्या जोमाने लढा उभारण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले की, तालुका अध्यक्षांनी मांडलेले मुद्दे हे प्रत्यक्ष ग्राउंड रिपोर्टवर आधारित आहेत. सत्ताधाऱ्यांकडून खोटे गुन्हे दाखल करून विरोधकांना त्रास देण्याचे प्रकार वाढले आहेत. मात्र, अशा परिस्थितीत खचून न जाता गावागावात जाऊन नागरिकांचे प्रश्न सोडवावेत, स्वतःचे नेतृत्व उभे करावे आणि आठवड्यातून किमान दोन दिवस तालुका स्तरावर कार्यालय सुरू ठेवून जनतेशी संपर्क वाढवावा. तसेच सार्वजनिक व सामाजिक कार्याचा अजेंडा पुढे घेऊनच सर्वांनी वाटचाल करावी, असेही त्यांनी नमूद केले. लवकरच प्रत्येक तालुक्यात पक्ष कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही अडचणीत कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपण सर्वजण शरदचंद्र पवार यांच्या विचारांवर चालणारे आहोत. पक्ष फुटल्यामुळे ताकद कमी झाली असली, तरी उरलेले कार्यकर्ते हेच खरे बळ आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीसोबत लढवण्यात आल्या असून, आता संघटन वाढीसाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मे महिन्यात सलग सात दिवस तालुका बैठका घेऊन संघटन मजबूत करण्यात येणार असून महिला, विद्यार्थी व युवक संघटनांवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना बदलून कार्यक्षम कार्यकर्त्यांना संधी देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




याशिवाय, येत्या १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रत्येक तालुक्यात साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर केला जाणार असून, बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देणार नसल्याचे त्यांनी सांगितले. सर्व कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी एकजुटीने काम करावे, असे आवाहनही करण्यात आले.

उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पक्षाची ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आहे. प्रत्येक गावात संघटन पोहोचवून नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आवश्यक आहे. युवक, महिला आणि विद्यार्थी यांना पक्षाशी जोडून संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे. तसेच येणाऱ्या काळात महाविकास आघाडी मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. दक्षिण कार्याध्यक्ष सीताराम काकडे यांनी प्रास्ताविक केले तर अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी आभार मानले.

# SPOT NEWS

## ढवळपुरीतील रोजगार सेवकावर निधी अपहाराचा गंभीर आरोप

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथे रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून, ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या रोजगार सेवकाने बोगस मजुरांची नावे टाकून तसेच स्वतः च्या नावावरही रक्कम काढून शासकीय निधीचा अपहार केल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रार करत संबंधित रोजगार सेवकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, येत्या १५ दिवसांत कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. ढवळपुरी हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून येथे रोहयो अंतर्गत विविध कामे सुरू आहेत. या कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या रोजगार सेवक घुमटकर यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ऑनलाईन हजेरी पत्रकांची तपासणी केल्यानंतर अनेक व्यक्ती प्रत्यक्ष कामावर नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवून एटीएमद्वारे रक्कम काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये स्वतःचे नाव, कुटुंबातील सदस्यांची नावे तसेच इतर बोगस मजुरांची नावे टाकून निधी काढल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या आईचे नावही हजेरीत टाकण्यात आले असून त्या प्रत्यक्षात बाजारात भाजी विक्रीचे काम करत असल्याचे सांगण्यात आले आहे. तक्रारीनुसार, काही वयोवृद्ध व्यक्ती काम करण्याच्या स्थितीत नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवण्यात आली आहे. तसेच, काही व्यक्ती रांजणगाव एमआयडीसी येथे नोकरी करत असतानाही त्यांची नावे रोहयोच्या कामांमध्ये दाखवून रक्कम काढण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याशिवाय, विहिरींसारख्या विविध कामांवरही मोठ्या प्रमाणात बोगस मजुरांची नावे टाकून निधी उचलण्यात आल्याचे आरोप करण्यात आले आहेत. घुमटकर यांच्या ताब्यात असलेल्या एटीएम कार्डच्या व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण मजुरांच्या नोंदींची तपासणी करून ज्या-ज्या ठिकाणी गैरव्यवहार झाला आहे, त्या सर्व रकमा संबंधितांकडून वसूल कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करावा, अन्यथा १५ दिवसांत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## धनगरवाडी येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील धनगरवाडी येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिर व श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांना हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद व महाआरतीचा लाभ घेतला. पहाटेच्या शुभमुहूर्तावर झालेला जन्मोत्सव सोहळा विशेष आकर्षणाचा ठरला. मंदिर परिसरात भजन, आरती व धार्मिक विधींच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर दुपारी आयोजित महाप्रसादासाठी तब्बल दहा ते पंधरा हजार भाविकांनी उपस्थिती लावली. सायंकाळी पार पडलेल्या महाआरतीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्यास आ. संग्राम जगताप, राजाभाऊ कोठारी, अक्षय कर्डिले, बाजार समितीचे संचालक संदीप कर्डिले यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व अनेक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोकमठाण येथे आ.आशुतोष काळेंच्या हस्ते

# ९५ लाखांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोकमठाण येथे स्थानिक आमदार विकास निधीतून पुणतांबा रोड मारुती मंदिर ते देशमुख वस्ती या रस्त्याचे डांबरीकरण करणे (४० लाख), नागरी सुविधा विकास योजने अंतर्गत पुणतांबा रोड ते धोंडीराम गायकवाड वस्ती ते रेलवाडी मारुती मंदिर या रस्त्याचे खडीकरण (३० लाख) व गावांतर्गत बाजारपेठ विकसित करून अंतर्गत रस्ते सिमेंट कॉन्क्रेटिकरण करणे (२५ लाख) अशा एकूण ९५ लाखांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले की, कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कटिबद्ध असून मागील सहा वर्षात रस्ते विकासाच्या माध्यमातून दळणवळणाचे मार्ग अधिक सक्षम करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातून अनेक रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत तर काही रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. रेलवाडी रस्त्यावर असलेल्या अनेक मोठ्या खड्ड्यांमुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यातून, चिखलातून स्थानिक नागरिकांना, शाळकरी विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना प्रवास करतांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत होता. याच रस्त्यावरून शेतकऱ्यांना शेतातून शेतमालाची ने-आण करतांना जीव घेणी कसरत करावी लागत होती अशा अनेक अडचणी रस्त्यामुळे नागरीकांना येत होत्या. तसेच पावसाळ्यात बाजारपेठेतील चिखलामुळे भाजी विक्रेत्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या अडचणी दूर करण्यासाठी रस्ते आणि बाजारपेठेच्या विकासासाठी निधी देवून नागरीकांच्या अडचणी कायमच्या मार्गी लावल्या असल्याचे त्यांनी सांगितले. त्याबद्दल कोकमठाण ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकरराव रोहम, दिलीपराव बोरणारे, सुरेश जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारूदत्त सिनगर, माजी संचालक बाळासाहेब बारहाते, माजी पंचायत समिती सदस्य मधुकरराव टेके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, गौतम सहकारी बँकेचे व्हा.चेअरमन विजय रक्ताटे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे संचालक महेश लोंढे, गोदावरी खोरेचे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक विजयराव थोरात, शिरीष लोहकणे, सुदाम लोंढे, सुनील लोंढे, दादासाहेब साबळे, शांताराम लोहकणे, संजय थोरात, अरविंद रक्ताटे, दिपक रोहम, ज्ञानेश्वर रक्ताटे, संजय थोरात, विजय रक्ताटे, भाऊसाहेब काशिद, अनंत रक्ताटे, विशाल जाधव, डॉ.आशिष डूबे, सिद्धार्थ लोहकणे, शिवाजी कराळे, शरद फटांगरे, मधुकर रक्ताटे, संभाजी देशमुख, संतोष लोंढे, बनेमिया सय्यद, प्रशांत मोरे, वाल्मीक कापे, संभाजी गायकवाड, विजय थोरात, सुखदेव महाजन, प्रभाकर धिवर, विजय देशमुख, शांताराम त्रिभुवन, अविनाश निकम, कैलास कदम, सचिन जाधव, प्रभाकर आबक, तुषार बाराहाते, राजेंद्र रोहाम, अजित रक्ताटे, गणेश बाराहाते, अरविंद रक्ताटे, सदाशिव रक्ताटे, संदीप धिवर, राजेंद्र भाकरे, जावेद सय्यद, मधुकर रोहम, प्रकाश देशमुख, शिवाजी देशमुख, दिलीप देशमुख, दिलावर सय्यद, परसराम लोहकणे, राहुल सोळसे, अजय थोरात, विजय भोसले, सुरेश काशिद, अलाउद्दीन सय्यद, दत्तात्रय हाडोळे, दिपक रक्ताटे, रवींद्र खाडे, गोरक्षनाथ लोहकणे, बांधकाम विभागाचे रणजित तामखाणे, राजेंद्र रोहोम, ग्रामसेवक विजय पाटील, राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## अकोले शहरातील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी प्रक्रिया सुरू

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक २५ मार्च २०२६ रोजी काढलेल्या निर्णयानुसार, राज्यातील १/१/२०११ पर्यंत अस्तित्वात असलेली केवळ निवासी अतिक्रमणे नियमानुसार नियमित करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अकोले नगर पंचायत हद्दीतील शाहूनगर व इंदिरानगर परिसरातील पात्र निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



सातत्याने पाठपुरावा करणारे माजी आ. वैभवराव पिचड, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले आणि नगरसेवक यांचे सह शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे संबंधित नागरिकांनी स्वागत केले आणि आभार व्यक्त केले आहेत.

नगर पंचायत प्रशासनाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा.

महत्वाच्या सूचना : ०१/०१/२०११ पूर्वी अस्तित्वात असलेले आणि सध्या निवासी वापरात असलेले बांधकामच पात्र राहील. अर्जासोबत नागरिकांनी वास्तव्याचा पुरावा (वीज बिल, मालमत्ता कर पावती, मतदार यादीतील नाव, आधार कार्ड/इतर ओळखपत्र), स्वयंघोषणापत्र व शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. शासन निर्णयानुसार ५०० चौ. फूटपर्यंतचे निवासी अतिक्रमण विनामूल्य नियमानुकूल करण्यात येईल; त्यापुढील क्षेत्रासाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शुल्क आकारले जाईल.

अकोले नगर पंचायत प्रशासनाद्वारे लवकरच अर्ज स्वीकृती, पडताळणी व पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्र सूचना प्रसिद्ध करण्यात येतील. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी नगर पंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा, असे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, मुख्याधिकारी धनश्री पवार, सर्व नगरसेवक आणि प्रशासनाने आवाहन केले आहे.

## चेतन रेपाळे 'तपोवन हनुमान केसरी २०२६'चा मानकरी

### अंतिम लढतीत सुशांत तांबोळकरवर ५-२ अशी मात

**● पारनेर । वीरभूमी–**

नाशिक येथील तपोवन परिसरात २ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय 'तपोवन हनुमान केसरी' कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याचे सुपुत्र पै. चेतन रेपाळे याने घवघवीत यश संपादन केले. अंतिम लढतीत कोल्हापूरच्या सुशांत तांबोळकरचा पराभव करत चेतनने 'तपोवन हनुमान केसरी २०२६' हा किताब आणि मानाची चांदीची गदा आपल्या नावावर केली.



ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय कुस्ती नियमांनुसार विविध वजन गटांत पार पडली. महिला कुस्तीगीरांच्या लढती प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरल्या. पुरुषांच्या खुल्या गटात राज्यातील तब्बल ३२ कसलेल्या मल्लांनी सहभाग नोंदवला होता. दिवसभर चाललेल्या अटीतटीच्या लढतींनंतर अंतिम फेरी पारनेरचा चेतन रेपाळे आणि कोल्हापूरचा सुशांत तांबोळकर यांच्यात रंगली.

अंतिम लढतीत चेतनने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत सुशांतवर ५-२ अशा गुणांनी मात केली. या विजयाबद्दल पै. चेतनला १ लाख १ हजार रुपये रोख आणि मानाची चांदीची गदा देऊन गौरविण्यात आले. गेल्या महिन्यात वाघोली येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत त्याने तिसऱ्या क्रमांकापर्यंत मजल मारली होती. त्याची गेल्या दोन वर्षांतील प्रगती पाहता तो लवकरच 'महाराष्ट्र केसरी' आणि आंतरराष्ट्रीय पदक विजेता होईल, असा विश्वास कुस्ती क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

या स्पर्धेत डबल महाराष्ट्र केसरी पै. हर्षवर्धन सदगीर यांचा सन्मान करण्यात आला.

स्पर्धेचे आयोजन माजी खासदार हेमंत गोडसे, रोहन देशपांडे आणि उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. उत्तम दळवी यांनी केले होते. विजेत्यांचा सत्कार हेमंत गोडसे, विजय कळसकर, रवींद्र मोरे, सूर्यकांत लोटे आणि मधुकर वाघ यांच्या हस्ते करण्यात आला.

पै. चेतनच्या या यशात वस्ताद नगरसेवक पै. युवराज पठारे, पै. कुंडलिक पठारे, पै. बाळासाहेब पठारे, पै. यशवंत पठारे, पै. धनंजय खर्से, पै. शंकर खोसे तसेच छखड कोच पै. नितीन पवार व पै. शामलाल भारतवाज यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

या विजयामुळे पारनेर तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# श्री रुक्मिणी सहकारी बँकेची दमदार कामगिरी; ७.३८ कोटींचा ढोबळ नफा

### निव्वळ नफा ३.२० कोटी । शून्य नेट एनपीए राखत आर्थिक सुदृढतेची नोंद

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

स्थानिक पातळीवर विश्वासार्ह बँकिंग सेवा देणाऱ्या श्री रुक्मिणी सहकारी बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल ७.३८ कोटी रुपयांचा ढोबळ नफा मिळवला आहे. सर्व तरतुदी केल्यानंतर बँकेचा निव्वळ नफा ३.२० कोटी रुपये इतका झाला असल्याची माहिती व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग विठ्ठल गुंड यांनी दिली.

अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात एकूण दहा शाखा असून संपूर्ण महाराष्ट्रात कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेने चेअरमन सी.ए. वसंतराव बापूराव गुंड व व्हाइस चेअरमन सी.ए. सुरेश रावसाहेब गावडे यांच्या नेतृत्वाखाली उल्लेखनीय प्रगती साधली आहे. मुख्य अधिकारी प्रदीप जालिंदर जगताप आणि सुनिल नामदेव जगताप यांच्या सक्षम प्रशासकीय कामकाजामुळे बँकेने ही यशस्वी झेप घेतली आहे.




दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील अहवालानुसार, बँकेने केवळ नफ्यातच नव्हे तर एकूण व्यवसायवाढीतही भरीव प्रगती साधली आहे. बँकेकडे सध्या २२३.०७ कोटी रुपयांच्या ठेवी असून १५६.०१ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. याशिवाय बँकेची गुंतवणूक १००.५९ कोटी रुपये असून एकूण एकत्रित व्यवसाय ३७९.०८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

बँकेचा भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) २३.६२ टक्के असून पीसीआर १०२ टक्के आहे. विशेष म्हणजे, उत्तम व्यवस्थापनाच्या जोरावर बँकेने आपला नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळवले आहे, ही बाब बँकेच्या आर्थिक सुदृढतेची साक्ष देणारी आहे. यावर्षी बँकेने १.४८ कोटी रुपयांचा आयकर भरला असून सभासदांना नियमित लाभांश देण्याची परंपराही कायम ठेवली आहे.

पारदर्शक व्यवहार, डिजिटल बँकिंग सेवा आणि ग्राहकाभिमुख धोरणांमुळे बँकेवर सभासद, ग्राहक आणि ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. बँकेच्या या यशामागे संचालक मंडळाचे मार्गदर्शन, सक्षम प्रशासन आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांची निष्ठा व प्रामाणिकपणा हेच प्रमुख घटक असल्याचे ॲड. पांडुरंग गुंड यांनी नमूद केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS



### नाशिक महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंतापदी दानिश शेख यांची नियुक्ती

**● कोपरगाव । वीरभूमी–**

हे गौतम पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी व सार्वजनिक बांधकाम विभाग अकोले येथे कार्यरत असलेले दानिश शेख यांची नुकतीच नाशिक महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंतापदी नियुक्ती झाली असून कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त आमदार आशुतोषकाळे यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अभियंता दानिश शेख हे गौतम पब्लिक स्कूलचे प्राचार्य नूर शेख यांचे धाकटे चिरंजीव व सध्या मीरा–भाईंदर नवघर डिव्हिजन येथे एसीपी म्हणून कार्यरत असलेले सोहेल शेख यांचे ते धाकटे बंधू आहेत. दानिश शेख यांचे शिक्षण गौतम पब्लिक स्कूलमध्ये झाले असून अभियांत्रिकी शिक्षण येवला व संगमनेर येथे पूर्ण केले आहे. ते हॉकीचे उत्कृष्ट खेळाडू असून देश व राज्य पातळीवरील अनेक स्पर्धा त्यांनी गाजवल्या आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे तसेच संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांनी गौतम परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी संस्थेचे इन्स्पेक्टर नारायण बारे, गौतम पॉलिटेक्निकचे प्राचार्य वासिम शेख उपस्थित होते.

### लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत केडगावच्या सरस्वती विद्यालयाचे यश



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी राज्य आणि जिल्हा पातळीवर उज्वल कामगिरी करत शाळेचे नाव उंचावले आहे. इयत्ता पहिलीतील देवांश महेश जाधव याने राज्यात सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरीतील आराध्या सोमनाथ जाधव हिने राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. त्याच इयत्तेतील श्रेया संजय मरकड हिने राज्यात अकरावा व जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला, तर कु. अंजली नवनाथ मळेकर हिने राज्यात पंधरावा व जिल्ह्यात आठवा क्रमांक पटकावला. इयत्ता तिसरीतील कु. लावण्या राजू बोरगे हिने राज्यात एकोणिसावा व जिल्ह्यात बारावा क्रमांक मिळवला. कु. स्वरा समीर कुलकर्णी हिने चौतीसावा व जिल्ह्यात चोवीसावा क्रमांक मिळवला. इयत्ता चौथीतील कार्तिक अतुल सोनवणे याने राज्यात तिसावा व जिल्ह्यात तेवीसावा क्रमांक मिळवला, तर चि. श्लोक संजय मरकड याने राज्यात पंचेचाळीसावा व जिल्ह्यात अडोतीसावा क्रमांक मिळवला. इयत्ता पाचवीतील चि. आयुष बाबासाहेब पडळकर याने राज्यात तेहतीसावा व जिल्ह्यात सहवीसावा क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक संदिप भोर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद तसेच पालकांनी कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धडकी भरवणारा प्रसंग! एसटी बस थेट प्रतिक्षालयात घुसली

## चालकाला चक्कर आल्याने नियंत्रण सुटले । पारनेर बसस्थानकात जीवघेणा थरार टळला

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर बसस्थानकात बुधवारी (१ एप्रिल) सकाळी घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. चालकाला अचानक चक्कर आल्याने एसटी बस (एमएच ०७ सी ९१३४) थेट प्रवाशांच्या प्रतिक्षालयात घुसली. त्या वेळी बसस्थानकावर प्रवासी आणि विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. मात्र काही सेकंदांच्या प्रसंगावधानामुळे शेकडो जीव वाचले आणि मोठा अनर्थ टळला.



मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश पडोळे (वय ५६, रा. कळस, ता. पारनेर) हे संबंधित बसचे चालक असून, त्यांनी सकाळी ८ वाजता कळस येथून पारनेर बसस्थानकात येऊन वडनेर बुद्रुकची नियोजित फेरी पूर्ण केली. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास परतल्यावर त्यांनी बस स्थानकाच्या एका बाजूला थोडा वेळ विश्रांती घेतली.

नंतर ११ वाजता अहिल्यानगरकडे जाणाऱ्या फेरीसाठी बस २ क्रमांकाच्या फलाटावर आणताना अचानक त्यांना चक्कर आली. नियंत्रण सुटल्यामुळे बस थेट प्रतिक्षालयाकडे भरधाव गेली. प्रवासी बसमध्ये चढण्यासाठी पुढे सरकत असताना हा प्रकार घडला. बसने प्रतिक्षालयातील लोखंडी खांबाला जोरदार धडक दिली, धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरात काही क्षण भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेच्या वेळी बसस्थानकावर जामगाव, भाळवणी आणि अहिल्यानगर मार्गावरील प्रवासी तसेच शाळा सुटल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. प्रसंगावधान राखून प्रवासी, महिला व विद्यार्थी बाजूला पळाले; काही जणांनी लहान मुलांना उचलून सुरक्षित स्थळी नेले. या सामूहिक सतर्कतेमुळेच संभाव्य जीवितहानी टळली.

अपघातानंतर चालक सुरेश पडोळे त्यांच्या सीटजवळच कोसळलेल्या अवस्थेत आढळले. तातडीने त्यांना बाहेर काढून जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांचा रक्तदाब अचानक वाढल्याचे समोर आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले. या घटनेमुळे चालकांच्या नियमित आरोग्य तपासणीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या अपघातात प्रतिक्षालयाच्या खांबाचे आणि परिसरातील काही भागाचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र काही काळ बसस्थानक परिसरात भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. प्रवाशांनी प्रशासनाकडे बसस्थानकातील सुरक्षेच्या उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, गेल्या काही महिन्यांत बस प्रतिक्षालयात घुसण्याची ही दुसरी घटना आहे. त्यामुळे बसस्थानकातील सुरक्षाव्यवस्था, चालकांची आरोग्य तपासणी आणि वाहन नियंत्रण याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षणात्मक बॅरियर्स, वेगमर्यादा नियंत्रण आणि चालकांची नियमित वैद्यकीय तपासणी अनिवार्य करण्याची गरज व्यक्त होत आहे.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, बस ज्या वेगाने प्रतिक्षालयाकडे आली, ते पाहून काही क्षणांसाठी जीव थरारला. काही सेकंद उशीर झाला असता तर मोठी दुर्घटना घडली असती. ही घटना टळली असली तरी पारनेर बसस्थानकातील हा थरारक प्रसंग प्रवाशांच्या मनात भीतीची छाया निर्माण करून गेला आहे. प्रशासनाने यापुढे ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर अशा घटना पुन्हा घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## संजीवनी पतसंस्थेस ४ कोटी निव्वळ नफा : विवेकभैय्या कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

ग्रामिण अर्थकारणाला पाठबळ मिळावे यासाठी माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांनी ४२ वर्षापुर्वी संजीवनी पतसंस्थेची स्थापना केली. २०२५.२६ याआर्थीक वर्षात संस्थेला ४ कोटी १ लाख रूपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती युवानेते व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी एका पत्रकाद्वारे दिली.



त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, संजीवनी पतसंस्थेस २०२५.२६ या आर्थीक वर्षात ४ कोटी ६८ लाख रूपये ढोबळ नफा झाला असुन ६७ लाख रूपयांची तरतुद करण्यांत आली आहे. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली संजीवनी पतसंस्थेने बँकींग क्षेत्रात नव्याने निर्माण होणाऱ्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करत कोपरगांव येथे सुसज्ज इमारत उभारली आहे.

सभासद ग्राहकांसाठी एनएफटी, आरटीजीएस, अद्यावत लॉकर यासह सर्व अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून सुवर्णतारणावर ९ टक्के व्याजदरांने कॅशकेडीट कर्ज सुविधाही दिली आहे. संस्थेकडे २०४ कोटी रूपयांच्या ठेवी असुन १५७ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करण्यांत आले आहे तर पतसंस्थेची ८४ कोटी रूपयांची गुंतवणुक असुन नेट एनपीए शुन्य टक्के, संस्थेचा ३८ कोटी रूपयांचा निधी तर खेळते भाग भांडवल २४९ कोटी रूपये आहे. कोळपेवाडी येथे संस्थेची एक शाखा कार्यरत आहे. पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक, सभासद, व्यवस्थापनाच्या सहकार्याने संजीवनी पतसंस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे विवेकभैय्या कोल्हे शेवटी म्हणाले.

## 'मुंबईत बॉम्बस्फोट होणार' अशी खोटी माहिती दिल्याप्रकरणी हिवरे कोरड्याचा तरुण अटकेत

### पोलीस हेल्पलाइनवर खोटा कॉल । गुन्हा दाखल, चौकशी सुरू

**● पारनेर । वीरभूमी–**

मुंबईत बॉम्बस्फोट होणार आणि शहराचा नाश होणार, असा खोटा कॉल करून पोलीस प्रशासनाची धावपळ उडवणाऱ्या एका तरुणाला पारनेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीचे नाव मयुर लक्ष्मण साळवे (वय ३०, रा. हिवरे कोरडा, ता. पारनेर) असून, त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:१६ ते १०:१७ च्या सुमारास मयुर साळवे यांनी पोलीस हेल्पलाइन 'डायल ११२' वर दोन वेळा कॉल केला. या कॉलमध्ये त्याने मुंबईचा नाश होणार आहे आणि मुंबईमध्ये ब्लास्ट होणार आहे अशी धक्कादायक माहिती दिली. मुंबईसारख्या संवेदनशील शहराबाबत अशा प्रकारचा कॉल आल्याने पोलीस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली.

घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे, गणेश डहाळे आणि अमोल धामणे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून कॉलरचा शोध सुरू केला. काही वेळातच हा कॉल हिवरे कोरडा गावातून आल्याचे निष्पन्न झाले आणि पोलिसांनी तात्काळ पथक पाठवून मयुर साळवे याला ताब्यात घेतले.

अहिल्यानगर येथील दहशतवादी विरोधी पथकाद्वारे आरोपीची चौकशी केली असता, त्याने केवळ खोटी अफवा पसरवण्यासाठी आणि पोलीस प्रशासनाला त्रास देण्यासाठी हे कृत्य केले असल्याचे समोर आले. त्याच्याकडे कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा घातपाताचा कट आढळला नाही, तरीही त्याच्या कृतीमुळे सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विशाल अंबादास टकले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात मयुर साळवे याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३५१(४) आणि २१७ अन्वये गुन्हा (रजिस्टर नंबर ४२२/२०२६) दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार जी. एन. डहाळे करत आहेत.

**पोलिसांचे आवाहन**

■ नागरिकांनी पोलीस हेल्पलाइनचा वापर फक्त आपत्कालीन परिस्थितीतच करावा. अफवा पसरवणे किंवा खोटे कॉल करणे हा गंभीर गुन्हा आहे, आणि अशा व्यक्तींवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# टाकळी मानूरमध्ये 'विराट हिंदू संमेलन' उत्साहात; भगव्या पताकांनी परिसर दुमदुमला

## भव्य शोभायात्रा । संत-महंतांची उपस्थिती आणि 'जय श्रीराम' घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तीमय

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील टाकळी मानूर येथे ३ एप्रिल रोजी 'हिंदू संमेलन' अत्यंत भव्य आणि दिव्य स्वरूपात पार पडले. या सोहळ्यानिमित्त काढण्यात आलेली शोभायात्रा, संत–महंतांची उपस्थिती आणि 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर भक्तीमय आणि चैतन्यमय झाला.

भव्य शोभायात्रा मुख्य चौकातून डीजे, ढोल–ताशा आणि टाळ–मृदंगाच्या निनादात सुरू झाली. यात गोविंद महाराज जाटदेवळेकर, जनार्धन स्वामी महाराज (निगमानंद संस्था), गणेश महाराज बडे भिलवडे, यादव महाराज लोणी, श्री विवेकानंद महाराज, हनुमंत महाराज मिडसांगवी, बारगजे महाराज, सागर उंडे, सोमराज बडे, उद्धव केदार, पंकज राठी, आदिनाथ लगड यांसह महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले. हातात भगव्या पताका, फटाके आणि 'भारत माता की जय' व 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मुख्य कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजन, दीपप्रज्वलन आणि भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित संत–महंतांचे स्वागत करण्यात आले. 'सांस्कृतिक वार्तापत्र'च्या विशेषांकाचे प्रकाशनही या कार्यक्रमात करण्यात आले, ज्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या हिंदू जागरणाचा प्रवास मांडण्यात आला.

गणेश महाराज म्हणाले, संघाने महंत, महाराज आणि कीर्तनकार यांच्या जोडीने हिंदू धर्म जागृतीचे जे कार्य केले आहे, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. गोविंद महाराज जाटदेवळेकर यांनी मुस्लिम समुदायाला गोहत्या न करण्याचे आणि हिंदूंना कसाई खान्यात गायी न विकण्याचे आवाहन केले.

हनुमंत शास्त्री म्हणाले, वारकरी संप्रदाय सर्वांना सामावून घेणारा असून भविष्यात हिंदू धर्माचे नेतृत्व करेल. हिंदू धर्म ही आपली आई असून तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. सागर उंडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंचपरिवर्तनावर प्रकाश टाकत नागरिक कर्तव्य, स्वबोध, पर्यावरण, कुटुंब प्रबोधन




आणि सामाजिक समरसता या विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक पसायदानाने झाली. त्यानंतर उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या संमेलनामुळे टाकळी मानूर पंचक्रोशीत हिंदू धर्म जागृतीचे नवे पर्व सुरू झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# चैत्रातील अवकाळीने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्याऐवजी वाढली चिंता

## पिकांचे नुकसान, भाव न मिळणे, महागाई आणि नैसर्गिक संकटांचा त्रास । शेतकऱ्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम

**पाथर्डी । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील प्रचलित म्हण आहे – चैत्र पडे, अन कुणबी रडे. यंदाच्या चैत्र महिन्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे तोंडचे पाणी पळवले आहे. आगामी वर्ष शेतकऱ्यांसाठी कठीण जाईल अशी आसमानी चाहूल बळीराजाला चिंताग्रस्त करते आहे.

एका बाजूने शेतमालाला भाव नाही तर दुसऱ्या बाजूने महागाई थांबायला तयार नाही. या परिस्थितीत जगायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांसमोर उभा आहे. गेल्या तीन दिवसांत तालुक्यात मुसळधार पाऊस आणि गारपीट झाल्यामुळे शेतमालाचे नुकसान झाले. फळबागा, भाजीपाला, कांदा, गहू, मक्याचे पीक या सगळ्याचं नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांचे घरगुती व्यवस्थापन सुद्धा धोक्यात आले आहे. बाजारात भाजी, पालक, कोथिंबीर इत्यादींच्या किमती फारच कमी आहेत, तरीही ग्राहकांना विक्री करताना त्यांना वाहतूक खर्च भरण्याचा त्रास सहन करावा लागतो. घरातील मुलांच्या शिक्षण, कुटुंबीयांच्या गरजा, आगामी हंगामासाठी चारा–धान्याची तरतूद अशा अनेक समस्यांमुळे शेतकऱ्यांची मानसिकता सध्या सतर्क आणि चिंताग्रस्त आहे.

ऊस उत्पादनातही नुकसानीची चिन्हे आहेत. गेल्या हंगामात हार्वेस्टर मशीनमुळे कामगारांचे दुखापती झाल्या, आणि पुढील हंगामात उसाचे प्रमाण कमी होईल अशी शक्यता आहे. चैत्रात आलेल्या पावसामुळे मशागतीचा वेळ उशिरा लागतो आणि जमीन पूर्णपणे तापलेली नसल्यामुळे पीक उत्पादकता कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांना विषारी पाऊस म्हणून हा पाऊस समजला जातो.

फळबागांमध्ये विशेषतः केशर आंबा, गावरान आंबा या उत्पादनात मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आंब्याच्या सिझनबाबत शेतकऱ्यांमध्ये शंका निर्माण झाली आहे. घरातील आवश्यक धान्य, कडधान्य, चारा सुरक्षित ठेवण्यावर त्यांचे लक्ष केंद्रीत आहे.

सामाजिक जीवनावरही याचा गंभीर परिणाम झाला आहे. अवैध सावकारी, गुंडगिरी, आत्महत्यांचे प्रमाण, विवाहसमस्यांमुळे कौटुंबिक शांती बाधित झाली आहे. तसेच, पाणी टंचाई, जागतिक युद्धाचा परिणाम, इंधन व बाजारातील महागाई अशा अनेक संकटांचा भास शेतकऱ्यांना होत आहे.

यंदा उन्हाळ्यातही फळांची मागणी नाही. कलिंगड, खरबूज, चिकू,



मोसंबी, केळी यांची विक्री फारशी होत नाही. बेकायदा कर्ज, आर्थिक तंगी आणि बाजारातील अस्थिरता यामुळे ग्रामीण भागात जीवन तणावग्रस्त झाले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सर्वांनी परस्परांना आधार देणे, एकमेकांच्या मदतीसाठी हात पुढे करणे गरजेचे आहे. ही काळाची गरज आहे की, सहकार्य आणि जागरूकतेच्या माध्यमातून अवकाळी संकटे आणि नैसर्गिक आपत्तींवर तोंड द्यावे.

# कर्मवीर शंकररावजी काळे यांची सोमवार (दि.०६) रोजी १०५ वी जयंती

**कोपरगाव । वीरभूमी –**

माजी खासदार, सहकार चळवळीतील अग्रणी नेते आणि शिक्षणप्रेमी स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सोमवार (दि.०६) रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सकाळी ९.०० वाजता पंचायत समिती, कोपरगाव येथे व त्यानंतर सकाळी ०९.३० वा. कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर शंकरराव काळे स्मृती–उद्यान, गौतमनगर येथे पुष्पांजली कार्यक्रम होणार असल्याची माहिती कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवन यांनी दिली आहे.



या जयंती सोहळ्यास माजी आमदार अशोकराव काळे, गौतम बँकेच्या माजी संचालिका सौ.पुष्पाताई काळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे, तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, मित्र मंडळाचे सदस्य व उदयोग समूहाच्या विविध संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी सहकार, शिक्षण, कृषी व सिंचन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या उन्नतीसाठी त्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून आर्थिक बळकटी दिली. त्यांच्या नेतृत्वामुळे कोपरगाव तालुक्यासह परिसरातील सहकार चळवळीला नवे बळ मिळाले. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे असून, रयत शिक्षण संस्थेच्या विस्तार आणि वाढीसाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा वारसा पुढे घेऊन जात ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचविण्यासाठी स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शिक्षण, उद्योग व सहकार क्षेत्रात अनेक संस्था उभ्या राहिल्या आणि हजारो कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यांच्या १०५ व्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे उपाध्यक्ष नारायणराव मांजरे यांनी केले आहे.

# पार्थ विद्या प्रसारकमुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय

## माजी विद्यार्थ्यांच्या योगदानाची दखल । महाविद्यालयात वृक्षरोपणासाठी संरक्षक जाळ्यांची मदत

**पाथर्डी । वीरभूमी –**

शैक्षणिक संस्थांच्या लौकिकामध्ये भर घालण्यासाठी संस्थेची गुणवत्तापूर्ण वाटचाल जशी कारणीभूत ठरते, तसे माजी विद्यार्थ्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण असते, असे मत बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी व्यक्त केले.



बाबूजी आव्हाड महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाच्या कार्यकारिणीची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी प्राचार्य डॉ. मच्छिंद्र फसले, सुभाष केकान, प्रा. डॉ. रमेश मोरगावकर, डॉ. विजय देशमुख, प्रा. प्रशांत साळवे, प्रा. अर्जुन केरकळ, कॅप्टन डॉ. अजय पालवे, प्रा. ब्रह्मानंद दराडे, संघाचे समन्वयक प्रा. डॉ. अशोक कानडे आदी उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अविनाश मंत्री होते.

माजी विद्यार्थी संघाने महाविद्यालयात नव्याने रोपण झालेल्या वृक्षांसाठी संरक्षक जाळ्या उपलब्ध करून दिल्या, ज्याबद्दल संस्थेकडून संघाचे आभार मानण्यात आले. बैठकीत विविध सदस्यांच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेऊन गुगल नेटवर्कच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांची संघटनात्मक बांधणी करण्याचे ठरवले गेले.

डॉ. चौरे म्हणाले की, पाथर्डी तालुका सतत दुष्काळी व उपेक्षित असल्यामुळे उच्च शिक्षणाची सोय विद्यार्थ्यांसाठी दुर्मिळ होती. साठ वर्षांपूर्वी दूरदृष्टीचे नेते माजी आमदार स्व. बाबूजी आव्हाड यांनी पार्थ विद्या प्रसारक मंडळाची स्थापना करून ही अडचण दूर केली. गेल्या पन्नास वर्षांत लाखो विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासह मोफत शैक्षणिक सुविधांचा लाभ घेतला.

महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर गेलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेबद्दल आपुलकी असणे स्वाभाविक आहे, मात्र शिक्षणाच्या माध्यमातून संस्थेशी न जोडलेल्या तालुक्यातील भूमिपुत्रांमध्येही आदर निर्माण होणे संस्थेच्या कार्याची पावती आहे. माजी विद्यार्थ्यांनी संस्थेसाठी केलेले योगदान महत्त्वाचे असून, येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय व्यासपीठ आयोजित करण्याचा निर्णय घेतला गेला. विविध समस्यांना सामोरे जाण्यासाठी माजी विद्यार्थी संघ काम करेल, असेही डॉ. चौरे यांनी सांगितले.

बैठकीत डॉ. फसले, प्रा. रमेश मोरगावकर, सुभाष केकान, अविनाश मंत्री यांनी मनोगत व्यक्त केले. सहविचार सभेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अशोक कानडे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. अजय पालवे यांनी मानले.

# भोयरे गांगर्डा शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात; विद्यार्थ्यांवर बक्षीसांचा वर्षाव

## भोगाडे यांच्या पुढाकारातून सामान्य ज्ञान स्पर्धा । गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा उत्साहात पार पडला. गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, विद्यार्थ्यांची मनमोहक सादरीकरणे आणि मान्यवरांची प्रेरणादायी उपस्थिती यामुळे कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे उद्घाटन ऐक्य सेवा सेंटरचे अध्यक्ष तुकाराम वाखारे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतगीताने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात सांस्कृतिक पर्व रंगले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समाजप्रबोधनपर, देशभक्तिपर, शेतकरी गीतांसह विविध नृत्यनाटिका आणि बालगीतांनी उपस्थितांचे मन भारावून टाकले. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या चिमुकल्यांनी आपल्या कलागुणांनी अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना वाखारे यांनी मराठी शाळांचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनविण्याचे आवाहन केले.

केंद्रप्रमुख माळी, माजी चेअरमन गोकुळ कळमकर तसेच शिक्षक बँकेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. सूत्रसंचालन आप्पासाहेब रसाळ व संतोष लगड यांनी उत्कृष्टरीत्या केले, तर आभार प्रदर्शन दुधाडे सर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धामणे सर, दरेकर सर, यादव सर, खेडकर मॅडम, गायकवाड मॅडम यांच्यासह गावातील युवकांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थ, महिला, तरुण वर्ग आणि पालकांची मोठी उपस्थिती हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनार्थ ग्रामस्थांनी उदार हस्ते बक्षिसरूपी निधी देऊन शिक्षणप्रेमाचे उदाहरण घालून दिले.

यावेळी सरपंच पूजाताई संतोष केकडे, उपसरपंच आदिनाथ



गायकवाड, माजी सरपंच भाऊसाहेब भोगाडे, चेअरमन अर्जुन रसाळ, व्हाइस चेअरमन सचिन रसाळ, माजी सरपंच अनिता भोगाडे, माजी उपसरपंच मोहन पवार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दौलत गांगड, उपाध्यक्ष वृषाली रसाळ, माजी अध्यक्ष युवराज डोंगरे, शिक्षणप्रेमी बापू भोगाडे, अश्विनी भोगाडे, शिवाजी रसाळ, अर्जुन डोंगरे, स्वप्निल भोगाडे, गोवर्धन डोंगरे, अर्जुन गांगड, शेखर पवार, किरण भोगाडे, संतोष राजणे, रवींद्र भोगाडे, सागर रसाळ, दत्ता गरदारे, जालिंदर पवार, सोमनाथ तरटे, अनिकेत लगड, अक्षय नितीन पवार, राजेंद्र रसाळ, युवराज रसाळ, सागर रसाळ, अक्षय भोगाडे, सुधीर गायकवाड, शुभम गायकवाड, ऋषी पवार, नितीन भोगाडे, गणेश रसाळ, अनिकेत भोगाडे, नाना केकडे, अशोक सातपुते, योगेश सातपुते, मधुकर लगड, विवेक गायकवाड, अभिजित भोगाडे, अंगणवाडी सेविका उज्वला भोगाडे, मदतनीस सुरेखा रांजणे, गौरी सातपुते, जान्हवी पवार, प्रांजल तरटे, सुनंदा सातपुते, प्रियांका कामठे, अर्चना डोंगरे यांसह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी व्हावी तसेच त्यांच्या ज्ञानात भर पडावी या उद्देशाने शालेय व्यवस्थापन समितीचे शिक्षणप्रेमी सदस्य बापूशेठ भोगाडे यांच्या संकल्पनेतून प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. इतर विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेतून आपला शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले.

**– वृषाली रसाळ,** उपाध्यक्ष

**– बापूशेठ भोगाडे,** सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती.